**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जॉर्डनमध्ये दाखल

- प्रधानमंत्र्यांविषयी काँग्रेस रॅलीत अपशब्द वापरल्याप्रकरणी संसदेत गदारोळ, AICTE, UGC चं एकत्रीकरण प्रस्तावित असलेलं विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे

- राज्यातल्या सर्व २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी

- पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्र्यांची कुलपती म्हणून नियुक्ती करणारं विधेयक राष्ट्रपतींनी फेटाळलं

**आणि**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी NIA कडून आरोपपत्र दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात जॉर्डनची राजधानी अम्मान इथं पोहोचले. जॉर्डनचे प्रधानमंत्री जाफर हसन यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. अम्मान इथल्या भारतीय समुदायानं केलेल्या स्वागताबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमाद्वारे त्यांचे आभार मानले. जॉर्डनचे राजे अब्दुल्ला दुसरे इब्न अल हुसैन आणि प्रधानमंत्री जाफर हसन यांच्याशी प्रधानमंत्री मोदी द्विपक्षीय चर्चा करतील. तसंच जॉर्डनमधल्या भारतीय समुदायाशीही संवाद साधतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल काँग्रेस नेत्यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करुन काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी करत, सत्ताधारी पक्षाच्या

खासदारांनी आज संसदेत गदारोळ केला. घोषणाबाजी सतत चालू राहिल्यामुळे लोकसभेचं कामकाज दिवसातून दोनदा तर राज्यसभेचं कामकाज एकदा तहकूब झालं.

दिल्लीच्या रामलीला मैदानावर काल झालेल्या काँग्रेसच्या सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा मुद्दा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेचं कामकाज सुरू झाल्यावर उपस्थित केला. या मुद्द्यावरुन काँग्रेसनं माफी मागावी अशी मागणी जे. पी. नड्डा यांनी राज्यसभेत केली. त्यामुळं झालेल्या गोंधळात दोन्ही सभागृहांचं कामकाज तहकूब झालं.

कामकाज सुरू झाल्यावर लोकसभेत कायदा रद्द करणं आणि दुरुस्ती विधेयक, अणुउर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक तसंच विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक सादर झालं. शिक्षा विधेयकातून UGC, AICTE आणि NCTE चं एकत्रीकरण होणार आहे. हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय लोकसभेनं घेतला. **लोकसभेत** आज एक लाख ३२ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांवरही चर्चा झाली.

राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यावर निवडणूक सुधारणांविषयी चर्चेला सुरुवात झाली. स्वच्छ आणि अचूक निवडणूक प्रक्रियेमुळे लोकशाही आणि मतदार सक्षम होतात, असं अण्णा द्रमुकचे नेते डॉक्टर एम तंबीदुराई म्हणाले. मतदानाचं सीसीटीव्ही फूटेज सार्वजनिक करावं तसंच लाईव्ह वेबकास्टिंगची सुविधा उपलब्ध करावी असं वायएसआर काँग्रेसचे वाय व्ही सुब्बा रेड्डी म्हणाले. तर मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणावरून सरकारवर आरोप करणाऱ्या विरोधकांवर माजी प्रधानमंत्री एच डी देवेगौडा यांनी टीका केली. समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव यांनी मतदान मतपत्रिकांद्वारे घेण्याची मागणी केली.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. या घोषणेनंतर सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये आचारसंहिता लागू झाली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

## ***होल्ड... कॅप्सूल***

*(राज्यभरातल्या २९ महापालिकांमधल्या एकंदर २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होईल. त्यापैकी १ हजार ४४२ जागा महिलांसाठी, ७५९ ओबीसींच्या, ३४१ अनुसूचित जमातींसाठी आणि ७७ जागा अनुसूचित जमातींसाठी आरक्षित आहेत. मुंबई महानगरपालिका निवडणुकीची अधिसूचना उद्या, तर उर्वरित २८ महानगरपालिकांच्या निवडणुकीची अधिसूचना गुरुवारी प्रसिद्ध होणार आहे. यासाठी २३ ते ३० डिसेंबरपर्यंत केवळ ऑफलाइन पद्धतीनं अर्ज भरता येतील. या पत्रांची छाननी ३१ डिसेंबरला होईल, २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील आणि ३ तारखेला अंतिम उमेदवार यादीसह चिन्हवाटप होईल. १३ जानेवारी २०२६ हा प्रचाराचा अंतिम दिवस असेल. सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल तर १६ जानेवारीला सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. मुंबई वगळता इतरत्र बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनं निवडणूक होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली...*

***होल्ड... बाइट १***

*२९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांसाठीच्या या निवडणुकीत ३ कोटी ४८ लाखांहून अधिक मतदार असून त्यांच्यासाठी ३९ हजार १४७ मतदान केंद्रं कार्यरत असतील. या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर होणार असल्या, तरी तांत्रिक समस्येमुळं व्हीव्हीपॅटचा वापर या निवडणुकांमध्ये होणार नाही, असं वाघमारे म्हणाले.*

***होल्ड... बाइट २***

*मुंबई, पुणे, नागपूर महानगरपालिकांमधल्या उमेदवारांना या निवडणुकीत जास्तीत जास्त १५ लाख रुपयांपर्यंत खर्च करता येईल. पिंपरी-चिंचवड, नाशिक आणि ठाण्यात १३ लाख, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि वसई विरामध्ये ११ लाख, तर उर्वरित १९ महापालिकांमध्ये उमेदवारांना प्रचारावर जास्तीत जास्त ९ लाख रुपये खर्च करता येतील.*

*१ जुलै २०२५ रोजी विधानसभा निवडणुकीच्या मतदारयादीत नाव असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात मतदान करता येईल, हे राज्य निवडणूक आयोगानं आधीच स्पष्ट केलं आहे. या निवडणुकांच्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या आज प्रसिद्ध झाल्या. २० तारखेला मतदान केंद्रांची आणि २७ डिसेंबरला मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिद्ध होईल. राज्य निवडणूक आयोगाच्या mahasecvoterlist.in या वेबसाइटवर तसंच 'मताधिकार' या मोबाईल ॲपवर मतदारयादीतलं नाव शोधता येईल. बहुसदस्यीय पद्धत असल्यानं या निवडणुकांमध्ये गृह मतदान शक्य नसल्याचं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. मात्र मतदान*

*केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवतींसाठी विशेष सुविधा असतील आणि त्यांना मतदानाला प्राधान्य दिलं जाईल, असंही आयोगानं नमूद केलं आहे.)*

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या राज्य विद्यापीठांचं कुलपतीपद राज्यपालांच्या ऐवजी मुख्यमंत्र्यांना देण्याचा प्रस्ताव असलेलं विधेयक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नामंजूर केलं आहे. पश्चिम बंगालच्या राज्यपालांनी २० एप्रिल २०२४ रोजी हे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवलं होतं.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आज जम्मू इथल्या एनआयए विशेष न्यायालयासमोर एकंदर सात आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं. लष्कर-ए-तैयबा आणि द रेझिस्टन्स फ्रंट या दोन दहशतवादी संघटनांवरही एनआयएनं आरोप लावले आहेत. १५००पेक्षा जास्त पानांच्या या आरोपपत्रात पाकिस्तानी दहशतवादी साजिद जट्ट याच्यासह ऑपरेशन महादेवअंतर्गत सुरक्षादलांच्या कारवाईत ठार झालेल्या तीन दहशतवाद्यांचाही आरोपपत्रात समावेश आहे.

**<><><><><>**

गाझियाबाद आणि नॉयडा इथलं प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठीच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. दरम्यान, दिल्लीतल्या हवेचा दर्जा खराब होत असल्यामुळं पाचवी पर्यंतच्या शाळांमधले प्रत्यक्ष वर्ग पुढच्या आदेशापर्यंत बंद ठेवण्याचे आणि ऑनलाईन वर्ग अनिवार्य करायचे आदेश दिल्ली सरकारनं दिले आहेत. सर्व प्रकारच्या शाळांना हे आदेश लागू होतील.

**<><><><><>**

भाजपाचे नवनियुक्त कार्यकारी अध्यक्ष नितिन नबीन यांनी आज दिल्लीत पक्षाच्या मुख्यालयात कार्यभार स्वीकारला. राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह अमित शाह, धर्मेंद्र प्रधान आणि इतर ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते. बिहारमधे मंत्रिपद सांभाळणारे नवीन ५ वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत.

<><><><>

पाश्चात्य देशांकडून सुरक्षा हमींच्या बदल्यात, नाटोमध्ये सामील होण्याचा प्रयत्न सोडून द्यायला युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की तयार झाले आहेत, मात्र आपला भूभाग रशियाकडे सोपवण्याचा अमेरिकेचा आग्रह त्यांनी फेटाळला आहे. युद्ध संपुष्टात आणण्यासंदर्भात अमेरिकेच्या राजदूतांसोबत चर्चा करताना त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

चर्चेपूर्वी बातमीदारांशी बोलताना झेलेन्स्की म्हणाले की, अमेरिका आणि काही युरोपीय राष्ट्रांनी युक्रेनला नाटोमध्ये समाविष्ट करायला नकार दर्शवला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून, नाटोच्या सदस्य देशांना दिल्या जाणाऱ्या हमींप्रमाणेच काही हमींची अपेक्षा युक्रेनला आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

६८ व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत मनू भाकर आणि सिमरनप्रीत कौर ब्रार यांनी सुवर्णपदकं पटकावली. नवी दिल्लीत झालेल्या या स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूल प्रकारात मनू भाकर हिनं ३६ गुणांसह सुवर्णपदक मिळवलं, तर कनिष्ठ गटात सिमरनप्रीत हिनं ३९ गुण मिळवून सुवर्णपदकावर नाव कोरलं.

<><><><>

भारताची सलामीवीर शेफाली वर्मा, नोव्हेंबर २०२५ या महिन्याची आयसीसीची सर्वोत्तम महिला खेळाडू ठरली.

//<><><><>//